पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८-
वैदयकीय विभाग(धन्वंतरी योजना)
क्रमांक – वैदय/१४ अ/कावि/६८१ /२०१८
दिनांक -०५/१२/२०१८

प्रति,
प्रशासन अधिकारी
शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८-

मुख्य लेखा अधिकारी
लेखा विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८-

विषय – पिंपरी चिंचवड मनपा अस्थापनेवरील अधिकारी, शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ योजना २०१३ लागू करणेबाबत.

संदर्भ – १) मा. धन्वंतरी स्वास्थ योजना समिती सभा दि. २९/९/२०१५.
२) मा. धन्वंतरी स्वास्थ योजना समिती सभा दि. २५/१०/२०१८.

२/- पिंपरी चिंचवड मनपा अस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता धन्वंतरी स्वास्थ योजना २०१३ लागू करणेत आलेली आहे. सदर योजनेच्या धोरणास मा. महापालिका सभेने ठराव क्र. ४७५ दि. २०/२/२०१४ तसेच महापालिका सभा क्र. ५४९ दिनांक १९/८/२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरची **योजना मनपा अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी बंधनकारक व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी** यांचे करीता ऐच्छीक करणेत आलेली आहे.

तसेच मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक प्रशा।२।कावि।२७१।२०१७ दि. १४।०६।२०१७ नुसार शिक्षण मंडळाच्या अखत्यारित असलेल्या प्राथमिक शाळांच्या सर्व इमारती सर्व जंगम मालमत्ता व स्थावर मालमत्ता, विविध बँकेतील सर्व खाती ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे वर्ग करणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहे. त्यामुळे शिक्षण विभागातील सर्व प्राथमिक शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक कर्मचारी यांची सेवा महानगरपालिकेकडे वर्ग **झाल्याने शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ योजना २०१३ लागू करणेबाबत मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६१० दि. २३/१२/२०१४ व मा. धन्वंतरी स्वास्थ योजना समिती सभेने दिनांक २५/१०/२०१८** अन्वये मान्यता दिलेली आहे.

अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सभासद नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरीता सोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्र (नमुना अ) प्रमाणे सर्व संबधीत अधिकारी, शिक्षक, तसेच सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे सभासद नोंदणीसाठी प्रतिज्ञापत्र (नमुना ब) फॉर्म भरून घेणेत यावेत. तसेच उपरोक्त संदर्भिय १ नुसार सध्याचे अधिकारी, शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे दरमहा वेतनातून र.रू. ६०० /- प्रमाणे व सेवानिवृत्त शिक्षक व अधिकारी यांचेकडून दरमहा वेतनातून र.रू. ३०० /- निधीची रक्कम कपात करणेत यावी.

सबब, सदरचे परिपत्रक संबधीत शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकांचे निदर्शनास आणून दयावेत. शिक्षण विभागातील सध्याचे अधिकारी, शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे फॉर्म भरतांना संबधित बीट पगार लिपीकाने संगणकावर फॉर्म भरून त्याची एक प्रत (Hard Copy) व upload केलेले कागदपत्रे व फोटो धन्वंतरी विभागास पाठवावी. व सदर लिपीकाने समक्ष येवून त्यांचे धन्वंतरी योजनेत समाविष्ट करणे बाबत कार्यवाही करावी. एखादया कर्मचा-याची माहिती संगणकावर upload न झाल्यास संबधीत बीट पगार लिपीकास जबाबदार धरणेत येईल.

तसेच लेखा विभागाने सेवानिवृत्त शिक्षकांची माहिती उपरोक्त नमूद केले प्रमाणे फॉर्म भरून घ्यावेत. व कागदपत्रासह पुर्तता करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८-